म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा. वा.
दा.क्र. 9224



BVBK-0401227

# इतिहासाचार्य राजवाडे

# इतिहासाचार्य राजवाडे

•

द. म. उतेकर

कांहीं नवी नवेंच करा : १०



१२२५ दि २०।५।६७
बा. वा.

BVBK-0401227




पन्नास नये पैसे


वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.



'इतिहासाचार्य' ही पदवी विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची. त्यांच्यासारखे तेच एक होऊन गेले मराठ्यांचा तेजस्वी इतिहास अंधाराच्या कांदीकोपऱ्यांतून परिश्रमानें व चिकाटीनें हुडकून काढण्याचे पुरुषप्रयत्न त्यानी केले. त्याचें हें चरित्र वाचून नव्या पिढींतल्या एखाद्याच्याहि मनात ती प्रेरणा उत्पन्न झाली तर केवढी मोठी कामगिरी होईल

श्री : १५९
::

© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि

::
प्रकाशक .
अ ल गाडगीळ
वोरा ॲण्ड कपनी
पब्लिशर्स, प्रा. लि. करिता
३, रा उ ड बि ल्डि ग,
का ळ बा दे वी र स्ता,
मु ब ई २.
::
आवृत्ति दुसरी : १९६२
::
मूल्य ५० नये पैसे
::
मुद्रक .
अनत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

# इ ति हा सा चा र्य रा ज वा डे

**मोठ्या माणसाची छोटी गोष्ट :**

वऱ्हाडातील एका लहानशा गावातील एक प्रसंग.

विशेष पहाण्यासारखें गावांत काही होते, असें नाहीं. तरीपण एक गृहस्थ गावातून हिंडत होता.

त्या गृहस्थाची नजर सारें गाव धुडाळीत होती. त्याच्या-कडे मात्र कुणाचेंच फारसें लक्ष नव्हते.

आणि तसें पाहिलें तर वरवर पहाणाऱ्याचे लक्ष वेधावें असें त्याच्याजवळ होतें तरी काय ?

पंचा, अंगात एक सदरा, त्यावर कोट आणि डोकीवर फेटा अशा पोशाखातील तो गृहस्थ खरेंच, कुणाचें लक्ष वेधून घेणार ?

नाही म्हणायला त्याच्या साध्या पोशाखातील टापटीप आणि त्याचें पिळदार शरीर मात्र लक्ष वेधण्यासारखें होतें.

फिरतां फिरता तो गृहस्थ एका दुकानासमोर थांबला. किराणा मालाचें दुकान होतें तें

तो गृहस्थ दुकानात आला.

पण त्यानें साखरेचा भाव विचारला नाहीं, डाळीची चौकशी केली नाहीं किंवा तेलाची खरेदी केली नाहीं.

त्यानें जें मागितलें तें ऐकून दुकानदाराला तर आश्चर्यच वाटलें

कारण रद्दीत पडलेल्या चारपांच कागदाची मागणी त्यानें दुकानदाराकडे केली होती

कितीतरी जुने झालेले ते कागद. खरें म्हणजे रद्दी म्हणून पुड्या बाधायलासुद्धा त्या जीर्ण कागदाचा फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता पण त्या गृहस्थाचें लक्ष त्याच कागदानी वेधून घेतलें होतें हवें असलेलें काहींतरी महत्त्वाचे त्याला गवसलें होतें

रद्दीतील त्या कागदाचे महत्त्व रु आ. पै यामध्येंच जीव अडकलेल्या त्या दुकानदाराला कसे कळावें ! एवढें मात्र त्यानें जाणले की ह्या कागदाची किंमत रद्दीपेक्षां काहींतरी अधिक आहे

त्या कागदांसाठीं खूप आग्रह आणि आर्जव करूनहि दुकानदारावर त्याचा काहींच परिणाम झाला नाहीं.

चांगला बदा रुपया समोर दिसला तेव्हा मात्र दुकानदाराचीं कळी खुलली आणि पैशानी ज्याचे मोल करता येणार नाही असे कागद हातीं पडल्याबद्दल तो गृहस्थहि अत्यंत आनदित झाला

वऱ्हाडात—इतक्या दूर—आल्याचें सार्थक झालें. गांवात भटकल्याचें चीज झाले.

कोण हे गृहस्थ ?

एवढे कसले कागद त्याना मिळाले कीं त्याबद्दल इतका आनद व्हावा ?

ज्यानी मराठ्याच्या इतिहासाचीं साधनें शोधण्यासाठीं फकिरी पत्करली आणि पायाची चाळण केली ते हेच विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, सुप्रसिद्ध इतिहाससशोधक. मराठ्याचा खराखुरा इतिहास ज्यांमध्यें दडून बसला

आहे असे काहीं कागद त्याना सापडले होते आणि त्यामुळें त्याना अतिशय आनद झाला होता.

चांगली नोकरीचाकरी करायची सोडून कसे वळले ते ह्या कार्याकडे ?

काय मिळवलें हें करून त्यानी ?

ह्या प्रश्नाचीं उत्तरे मिळवायचीं आहेत ना ? तर मग त्यासाठीं ह्या निग्रही पुरुषाचे जीवनचरित्रच पहावयास हवें.

**कोंकणांतून देशावर :**

भौगोलिकदृष्टया कोंकणचा प्रदेश खडकाळ. भरपूर पैका मिळवून देईल असें या भूमीत काय आहे ?

नसेल, पण ह्या खडकाळ भूमीनेंच साऱ्या भारताला ललामभूत होतील अशी लो टिळक, आचार्य विनोबाजी भावे यासारखी नररत्ने देऊन त्याची भरपाई केलेली नाहीं का ?

वरसई हें कोकणांतीलच एक गांव. त्या गावांतील काशिनाथपत राजवाडे याच्या घरात त्या दिवशीं आनंदाला भरतें आलें होतें. १२ जुलै १८६४ हाच तो दिवस. राजवाडे घराण्याचे नाव चिरजीव करील असे एक पुत्ररत्न जन्मास आलें होतें. विश्वनाथाचा जन्म झाला होता.

कोंकण प्रदेशावर निर्सगाचा वरदहस्त आहे खरें आहे.

सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नंदनवन ॥

अथाग सागर आणि दऱ्याखोऱ्यातून पसरलेला हिरवागार निसर्ग—असा हा कोकणचा प्रदेश डोळयाना सुखवितो,

मनाला आनंदवितो; पण पोटाला मात्र एकदरीनें उपाशीच ठेवतो.

त्यामुळें इच्छा असो वा नसो पुष्कळांना ह्या सुंदर भूमीचा त्याग करावा लागतो. पोटासाठीं—केवळ पोटासाठीं दुसरीकडे जावें लागतें.

राजवाडे घराण्याचेंहि तसेंच झालें. उद्योगधंद्यासाठीं म्हणून ते आले पुण्यांत आणि झाले पुण्याचे.

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे पुढें नावारूपास आले पण किती अडीअडचणींना तोंड देऊन ! त्या अडचणींचा, संकटांचा प्रारंभ झाला तो बालपणींच.

वडिलांचा—काशिनाथपंतांचा—मृत्यु हा पहिला आघात काशिनाथपंत वारले तेव्हां विश्वनाथ लहानच होता. सुदैव इतकेंच की, विश्वनाथाचे चुलते होते पुतण्यालाहि आपल्या जवळ करतील, त्याला प्रेमानें वागवतील, वडिलांच्या मृत्यूचें दुःख त्याला विसरायला लावतील असे, स्वतःच्या अपत्याप्रमाणे पुतण्यावर प्रेम करणारे त्याचे चुलते होते वडगांवला ते वकिली करीत.

चुलत्यांचे प्रेमळ कृपाछत्र आणि आईचें मायेचें पांघरूण असलेला विश्वनाथ वाढत होता. मोठा होत होता. बाळपणांतील एकेक दिवस जात होता.

विश्वनाथाचीं वयाचीं आठ वर्षें गेलीं तीं इकडेतिकडे भटकण्यांत. नदीवर पोहावयास जा, ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मार आणि त्याचाहि कंटाळा आला कीं

गावभर भ्रमति कर असा वेळीअवेळीं त्याचा उद्योग चालू असावयाचा.

आरोग्याच्या बाबतींत मात्र विश्वनाथ भाग्यवान होता. त्याची प्रकृति दणकट होती.

तालीम करण्याचा तर त्याला भारीच षोक. पोहण्यातहि पटाईत. पोहण्याच्या शर्यती असल्या की विश्वनाथ तिथें हटकून हजर असायचा आणि शर्यतीत पहिला क्रमांकच बहुधा पटकवायचा

**असें चाललें होतें शिक्षण :**

वयाच्या आठव्या वर्षी विश्वनाथाच्या शालेय शिक्षणाला खराखुरा प्रारंभ झाला

मराठी शाळेंत त्याचें नांव दाखल झालें शाळेंत नांव होतें तीन वर्षे पण प्रत्यक्ष उपस्थिति लागली ती मात्र फक्त दीडच वर्ष

त्या दीड वर्षांत तरी मनापासून त्याची शाळा झाली आहे का ?

तीन वर्षांतील बराचसा त्याचा वेळ गेला तो नेहमीं-प्रमाणें, म्हणजे त्यापूर्वीच्या कार्यक्रमाप्रमाणे घरीं आणि घराबाहेर विटीदांडू, पोहणे, उड्या मारणे व मारामारी करणें या धागडधिंग्यांतच

मग शाळेंत तो शिकला तरी काय ?

त्याकाळी आतांसारखी कांही भरमसाट पुस्तकें नव्हतीं आणि भरमसाट विषयहि नव्हते. लेखन, वाचन आणि

गणित यावर असायचा मुख्य भर. त्याप्रमाणें सामान्यत वाटेल तें वाचण्याइतकी आणि केरोपंताच्या अंकगणितांतील उदाहरणें सोडविण्याइतकी विश्वनाथाची तयारी निश्चित झाली होती

शाळेंत इतकी गैरहजेरी असतांनासुद्धा त्याची प्रगति मात्र त्या मानानें होती चांगली.

त्याचे कारण त्याची बुद्धिमत्ता आणि वरच्या दर्जाची ग्रहणशक्ति यापेक्षा दुसरें कोणतें असणार ? फारच थोडा अभ्यास करूनहि त्याला यशाची नेहमींच खात्री असे ती यामुळेंच.

त्यावेळच्या आपल्या शिक्षणाबद्दल स्वत. राजवाड्यांनींच लिहून ठेवलें आहे—

> "ह्या दीड वर्षाच्या काळात आठवड्यांतून दोनतीन दिवस घटका अर्धी घटका मी अभ्यास करीत असे व तेवढ्या अभ्यासावर वर्गांत माझा नंबर पंतोजीची अवकृपा व देहदंड न संपादण्याइतका वर राहात असे"

तो शाळेंत जाण्यास अळटळ का करी ? तेथें का शिकवित नव्हते ?

त्यासंबंधी स्वत राजवाडे काय म्हणतात पहा—

> "अत्यंत उच्च प्रतीचें शिक्षण मिळालेला व द्रव्यावर दृष्टि न ठेवतां केवळ स्वदेशांतील मुलें उदात्त विचारांची, उदात्त कृति करणारीं व स्वदेशावर प्रेम करणारीं निपजावी एवढ्याच हेतूनें अध्यापकाचा धंदा आयुष्यभर नम्रपणें करणारा

असा एखादा गुरु जर मला मिळाला असता, तर ह्या तीन वर्षांच्या अभ्यासात माझी प्रगति मुंबई-तील विश्वविद्यालयाच्या बी ए. च्या इतकी झाली असती, असे मला वाटतें. शिवाय धर्मनिष्ठा, देश-प्रीति वगैरे नैतिक गुणाचा उद्गम माझ्या ठायीं किती झाला असता त्याचा अदाज आता मला यथा-स्थित करता येतो ''

केवळ लिहिणे–वाचणें एवढें शिकण्याकरिता का शाळेंत जायचे ? बुद्धीप्रमाणे मनाचाहि विकास तेथें झाला पाहिजे

विश्वनाथ शाळेंत जात होता पण तिथें त्याला असे काहींच दिसत नव्हतें जें मुळात नव्हतेंच तें दिसणार तरी कसे ?

अशा परिस्थितींत शाळेंत जाण्यास विश्वनाथाकडून अळटळ झाली असेल, त्याचे मन तिथें रमलें नसेल तर त्यांत त्याचा दोष होता असे म्हणता येईल का ?

मराठी चौथी सपली आणि विश्वनाथ इग्रजी शाळेंत गेला. १८७६ साली पुण्यांतील बाबा गोखले याच्या शाळेंत तो गेला. पण तेथें तरी काय परिस्थिती होती ?

राजवाडे म्हणतात—

"सहापासून दहापर्यंतच्या चार तासातील पाच विषय मिळून माझ्या वाट्यास मास्तराच्या वाणीचा साक्षात् स्पर्श दोनअडीच मिनिटें येई."

असें चालले होतें विश्वनाथाचें शिक्षण यदा सरकारी शाळेंत तर दुसऱ्या वर्षीं मिशन स्कूलमध्यें अशी एकसारखी शाळेची आलटापालट होत होती विश्वनाथ शाळेंत जात

होता. मोठी आशा बाळगून एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत जात होता. पण त्याच्या पदरात काय पडत होतें ?

तो शाळेंत जात होता. जें काही पदरांत पडेल त्यातून आपल्याला उपयुक्त असें चागलें असेल तें सग्रहीत करीत होता आणि निवड करून नको तें दूर ठेवीत होता.

निवड करण्याची पात्रता त्याच्याजवळ होती. त्याशिवाय का प्रवेशपरीक्षेचा अभ्यास घरींच महिना दोन महिने करून तो ती परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला ?

१८८२ साली मुबई विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा विश्वनाथ उत्तीर्ण झाला.

आणि विश्वनाथपतानी कॉलेजमध्यें प्रवेश केला. कॉलेजमध्यें काय साराच कारभार इग्रजी. बसणे, उठणे, बोलणे, चालणें, लिहिणें, वाचणे साऱ्यावरच इग्रजीची छाया.

कॉलेजमध्यें आलेला विद्यार्थी एका निराळ्या जगात प्रवेश करतो मोठी इमारत, मोठे वर्ग, मोठी पुस्तकें, सारेंच काही निराळें त्यात तो भाबावून जातो

*पण राजवाड्याची स्थिति काय होती ?*

*ते कॉलेजच्या वातावरणात भाबावले नाहीत मुळीच दिपले नाहीत. त्याची नजर भपक्याकडे नव्हती, ज्ञानाकडे होती.* सामान्य विद्यार्थ्यांना भुरळ पाडणाऱ्या गोष्टी का या असामान्य विद्यार्थ्याला विचलित करणार ? वरवरचा भपका जसा त्यांना भुलविणारा नव्हता, त्याचप्रमाणे वरवरच्या भपक्यानें दुसऱ्याना भुलविण्याकडेहि त्याचा ओढा

नव्हता कारण विद्येइतकें शोभादायक असे दुसरे कांहीं आहे असें त्यांना वाटत नव्हतें.

नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार।
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार॥

## ज्ञानासाठीं भुकेलेला माणूस :

अन्नाप्रमाणेच राजवाड्याची ज्ञानाची भूकहि तशीच जबरदस्त होती ती शमावी म्हणून ते कॉलेजमध्यें आले होते पण त्याची निराशा झाली. घोर निराशा झाली.

"केवळ विद्यार्जन करण्याचा हेतु बाळगणारा मी नोकर तयार करण्याच्या गिरणींत जाऊन पडलो"

—असे म्हणण्याची पाळी त्याच्यावर आली

त्याच्यासारख्या सखोल ज्ञानाची अपेक्षा करणाऱ्या विद्यार्थ्याचें समाधान करील अशी परिस्थिती कॉलेज-मध्यें नव्हती.

कॉलेजमधील पहिले सहा महिने संपले. ह्या सहा महि-न्यात ते नवे काय शिकले ? त्याच्या दृष्टीनें तो वेळ वायाच गेला. म्हणूनच ते म्हणतात—

*"ह्या टर्मांत माझ्या ज्ञानात फारशी भर पडली असे वाटत नाही परीक्षेकरिता नेमलेल्या सर्व पुस्तकाचे आलोडन महिना पधरा दिवसाच्या एकाग्र अभ्यासाने करता येण्यासारखे होते. बाकीचा सर्व वेळ फुकट"*

ज्या कांहीं गोष्टीचा राजवाड्यानीं आयुष्यात कधींच लोभ धरला नाही, त्यात पैसा ही एक गोष्ट होती.

याचा अर्थ असा नव्हे कीं पैशावाचून त्याचे चालले. जगायचे म्हणजे पैसा हा हवाच. पण आपण तो मिळवावा, संग्रह करण्याकरिता नि श्रीमंत होण्याकरिता मिळवावा असा विचार त्याच्यापुढें कधींच नव्हता ते शिकले ते पैसा मिळविण्याकरिता नव्हे आणि त्यानीं काम केले तेंहि पैसा मिळविण्याकरिता नव्हे. ते शिकवण्या करू लागले.

शिकवणीसाठी पधरा-वीस मुलें येत राजवाडचाचें वर्ष दीड वर्ष असेच गेलें.

राजवाडचानीं डेक्कन कॉलेजमध्यें दुसरी 'टर्म' भरली अभ्यास झाला तो मात्र जेमतेम महिनाभर पण उत्तीर्ण होण्याकरिता त्याना अधिक अभ्यासाची जरूरी थोडीच होती ? त्याचा आत्मविश्वास त्याना हेंच सागत होता कीं 'तुझ्यासारख्याला उत्तीर्ण व्हायला महिनाभर अभ्यास पुरेसा आहे' आणि हा त्याचा आत्मविश्वास अनाठायी नव्हता. ते उत्तीर्ण झाले.

राजवाडचाचे वडील बधु त्याच सुमारास कॉलेजमध्यें 'फेलो' झाले विसुभाऊना त्याच्याकडून आर्थिक मदत मिळू शकली. पैशाची अडचण दूर होताच डेक्कन कॉलेजच्या वसतिगृहातच ते रहावयास गेले.

वसतिगृहात राहून त्यानी काय केले ?

तेथें राहून आपले मूळचे निरोगी शरीर त्याना अधिक बळकट करावयाचे होते.

आपल्या भावी आयुष्यातील धकाधकीच्या जीवनात त्याची फार आवश्यकता आहे, हें का त्याना कोणी सागावयास हवे होतें ?

आणि ज्ञानार्जन हें तर त्याचे जीवनकार्यंच होतें. पण हें योग्य प्रकारे व्हावें कसे ? योजनाबद्ध केलेले कोणतेंहि काम योग्य वेळीं होतें आणि परिणामीं लाभदायकहि ठरतें. आपल्या वेळेविषयी अतिशय काटेकोरपणे वागणाऱ्या राजवाड्यांनी आपला दिनक्रम ठरवूनच टाकला

तो असा होता–

"नियमानें पाच वाजता पहाटेस मी उठत असे व तालमींत जाऊन दोन तास उत्तम मेहनत करीत असें. बैठका, जोर, मल्लखाब व कुस्ती अशी सुमारें दीडदोन हजार मेहनत रोजची होई तों सात वाजत नंतर शेर दीड शेर दूध पिऊन अर्धातास कॉलेजाभोंवतालील मैदानांत व झाडाखालीं सहल व विश्रांति घेई. आठपासून नऊपर्यंतचा वेळ वर्तमानपत्रें वाचण्यात जाई पुढें एक तास नदीवर पोहणें होत असे. परत भोजन आटोपून खोलीकडे जो जावें तो नेमके साडेअकरा वाजत. नंतर अर्धातास समानशील दोनचार सद्‍गृहस्थांच्या समागमात जाई कॉलेजातील पुस्तकालयांतून आणिलेलें एखादें पुस्तक हिंडून, फिरून, निजून व बसून मी चांगले वाचून मनन करीत असें. वाचण्याचें काम चार-साडेचारपर्यंत चाले मग शादिल-बोवाजवळील होडीखान्यांत एखाद्या होडग्यांत सात वाजेतो नदीवर पाच सात मैलाचें वल्हवणें करीं तेथून परत येऊन संध्या, भोजन जो आटोपावें तो साडेआठ वाजत. नंतर दहा-साडेदहा वाजेतों अनेक स्वभावाच्या विद्यार्थ्यांशी सामाजिक, राजकीय, धार्मिक व पाठशालेय विषयांवर नाना प्रकारच्या गप्पा चालत. साडेदहापासून

पहाटेचे पांच वाजेपर्यंत खोलींतील दोन टेबलावर घोंगडी पसरून त्यांवर ताठ उताणे निजले म्हणजे मला गाढ झोप येई"

हा दिनक्रम, हा आराखडा नुसता कागदावर लिहून ठेवलेला नव्हता त्यानुसार त्याचा नित्यनेम सुरू होता

आणि असा नियमितपणे वागणारा विद्यार्थी सन १८८४ ते १८९० ह्या कॉलेजातील सात वर्षांत एकहि दिवस कधी आजारी पडला नाहीं.

**असामान्य विद्यार्थी :**

अभ्यासाचे बाबतीत तासन्तास घोकपट्टी करून निष्कारण शरीर आणि वेळ याचा अपव्यय करावा हें राजवाड्यांना बिलकुल पसत नव्हते त्याऐवजीं तो वेळ स्वतत्र पुस्तकें वाचण्यात ते घालवीत

त्यानीं पुस्तकें वाचली खूप पुस्तके वाचलीं. पण ती कोणती ? विविध विषयाचे ज्ञान देणारी शुद्ध ज्ञानार्जन हा एकच हेतु त्यामागें होता.

१८८८ सालीं बी. ए ची पहिली परीक्षा ते बाहेरून उत्तीर्ण झाले पण परीक्षेकरिता म्हणून अभ्यास करण्यासाठी त्यानीं जे दिवस खर्च केले ते मात्र वर्षांतील ३६५ पैकी फक्त वीस-पचवीसच !

दुसऱ्या बी. ए च्या परीक्षेकरिता त्यानी जो मुख्य विषय घेतला तो इतिहास म्हणजे इतर विषयाकडे त्याचे लक्ष नव्हते किंवा त्याची त्याना आवड नव्हती, असें मात्र नाही कॉलेजातील सात वर्षांच्या काळात इतिहासाप्रमाणे

अर्थशास्त्राचा अभ्यास त्यानी केला. नीतिशास्त्र अभ्यासिलें. तर्कशास्त्र व मानसशास्त्र याचेहि सखोल अध्ययन केलें वनस्पतिशास्त्र व फारसी भाषा याचेहि ज्ञान या काळात त्यानी सपादन केले फ्रेंच ग्रंथाचें वाचन करण्यातहि त्यांचा काहीं काळ गेला

इतकें विविध वाचन आणि तेंहि मननपूर्वक करण्यात राजवाड्याची विद्येबद्दलची खरीखुरी आवडच दिसून येते.

इतिहास हा किती महत्त्वाचा विषय. पण ज्या ठिकाणी अशा महत्त्वाच्या विषयाचे व्यासंगी विद्वान् तयार व्हायचे त्या विद्यापीठात या विषयाची काय स्थिति होती ?

इतिहास हा विषय शिकविणारा डेक्कन कॉलेजात त्यावेळी एकहि प्राध्यापक नव्हता इतकेंच नव्हे तर इतिहास हा विषय घेऊन बी. ए. च्या परीक्षेला बसणारे विसुभाऊ राजवाडे हेच सबध कॉलेजात एकटे एक विद्यार्थी होते !

यापेक्षां इतिहास विषयाची हेळसांड ती आणखी कोणती असावयाची ?

अशा परिस्थितीत कॉलेजच्या वर्गात जाऊन बसण्यात राजवाडे काय साध्य करणार होते ? कॉलेजच्या वसतिगृहांत ते राहिले. चागली ऐंशी रुपये फी देऊन राहिले पण कशासाठीं–'निव्वळ कॉलेजातील खोलीचा, हवेचा व जवळील नदीचा उपयोग करून घेण्याकरिता'

नेहमींप्रमाणेंच परीक्षेसाठीं म्हणून त्यानी अवघा महिनाभर अभ्यास केला आणि नेहमींप्रमाणें ते त्यात उत्तीर्णहि झाले. राजवाडे बी ए. झाले

राजवाड्यांनी कॉलेजशिक्षण सपविले. सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा ते एक वेगळेच विद्यार्थी होते यात शकाच नाही. उच्च शिक्षणाच्या या काळांत खरोखरच त्यानीं काय मिळविलें ?

त्याचे उत्तर राजवाड्याच्या शब्दातच पहाणें अधिक युक्त होईल ते म्हणतात—

" १८८४ पासून १८९० पर्यंत मला व्यर्थ रखडत राहावे लागलें. ह्या रखडण्यात एवढें मात्र झाले की, माझ्या मनाला जें योग्य वाटले तेंच मी केलें, आणि कॉलेजांतील खुळसट शिस्तीला बळी न पडतां, मन व मेंदू याना शैथिल्य व शीण येऊ न देतां, जगात जास्त उत्साहानें काम करण्यास मी सिद्ध झालों "

खुद्द राजवाड्याना काय वाटायचे तें वाटो पण जगाला ते बी ए झाल्याचें दिसत होतें. आणि जगाच्या दृष्टीनें तें महत्त्वाचेहि होतें. मोठा पगार देणारी मोठी नोकरी मिळ-ण्यासाठी लागणारी लायकी त्यांनीं आता संपादिली होती

जीवनाचे सार्थक देशासाठी, दुसऱ्यासाठीं कांहींतरी चागले करण्यांत आहे हा बीजरूपानें त्यांच्या अत करणांत असलेला विचार वाचनाचा खुराक मिळतांच चांगलाच रुजला. खरेंच आहे, चांगले ग्रथ हे सन्मित्राप्रमाणें आपणास चांगला मार्ग दाखवितात

सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणें राजवाड्याची दृष्टि नव्हती. काहीं भव्य, उदात्त पाहण्याची आणि त्यापासून स्फूर्ति घेण्याची उत्कठा आणि तळमळ त्याना होती.

सरकारी नोकरी म्हणजे केवळ गुलामगिरी आहे असें विष्णुशास्त्री म्हणाले होते आणि त्याप्रमाणें त्यांनीं त्या नोकरीवर लाथहि मारली होती. या गोष्टीचा परिणाम राजवाडे याच्यावर होणें स्वाभाविक होतें.

राजवाड्यानींच स्वत. म्हटलें आहे–

"शाळेंतून जातांना व येतांना आणि शहराच्या पश्चिम भागांत हिंडतांना शास्त्रीबोवाच्या मूर्तीस अनेकवार पाहिलें होतें. त्या पुरुषासंबंधानें अनेक गोष्टींचा माझ्या मनावर सस्कार झाला."

थोरांचे आदर्श जीवन नेहमीं दृष्टीसमोर असावें असें म्हणतात, तें उगीच नव्हे.

'विद्या करून नोकरी मिळविणें हा मोक्ष नव्हे.' 'विद्या केवळ ज्ञानार्जनाकरितां शिकावयाची' वगैरे जे विचार थोरामोठ्याच्या तोंडून त्यांनीं ऐकले त्याचा परिणाम त्या दृष्टीनें मशागत झालेल्या त्याच्या मनावर अधिकच व्हावा आणि राजवाडे मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरीपासून दूर, दूर, फारच दूर जावेत हें स्वाभाविकच घडले.

**पाहिजे होतें फक्त काम :**

राजवाड्यानीं नोकरी केली. नाहीं असें नाहीं. पण मोठी नोकरी केली नाहीं. तशी नोकरी मिळण्यासारखी असूनहि तिकडे लक्ष दिलें नाही.

शिक्षक म्हणून त्यांनी फारच थोडे दिवस नोकरी केली पण जी काही केली ती तळमळीनें, पैशाकडे दृष्टि न ठेवता.

विद्यार्थ्यांनीं स्वावलबी बनावें असें त्यांना वाटे.

स्वकष्टाविना सारेंच जर त्याना आयतें मिळू लागले तर त्या विद्येचें महत्त्व तरी विद्यार्थ्यांना काय वाटणार ?

'स्वयेंचि कष्टत गेला तोचि भला.'

शिक्षणदानाचे हें कार्य महत्त्वाचे नव्हतें असें कोण म्हणेल ? पण राजवाड्यांची झेप मोठी होती, वेगळीच होती त्यापेक्षांहि मोठें काम करण्याची त्याची पात्रता असताना आणि देशालाहि तशा कामाची गरज असतांना त्यानीं विशाल क्षेत्रात का प्रवेश करू नये ?

त्याना पैसा नको होता, मान नको होता, कीर्ति नको होती–त्याना पाहिजे होतें फक्त काम. देशाचें काम ज्याकडे आतांपर्यंत फारसें कोणी लक्ष दिले नव्हतें आणि दिलें असलें तरी केवळ एक हौस म्हणून दिलें होतें तें काम त्याना करावयाचें होतें. सारा वेळ त्यासाठीं देऊन करावयाचे होतें

ते काम होतें इतिहास संशोधनाचे. मोठें जिकिरीचे, कटकटीचे, त्रासाचे असें हें काम होतें. जुनेपुराणे ऐतिहासिक कागद सशोधनाच्या दृष्टीनें वाचणें हें काम का कथाकादंबरी वाचण्याइतकें सोपें होते ?

राजवाड्यानी तें करावयाचे ठरविलें अनेक अडचणी त्यामध्यें असतांना निर्धाराने करावयाचे ठरविलें.

इतिहास सशोधनासारखें जिकिरीचे आणि त्रासाचें काम करण्यासाठीं आवश्यक त्या कोणत्या गोष्टी त्यांच्याजवळ होत्या ? एके ठिकाणी आरामशिरपणें बसून करण्यासारखें का तें काम होतें ? त्याला हिंडायला हवें होतें. त्यासाठी शरिराचें पाठबळ त्यांना होतें; पण पैशाचें मात्र नव्हतें.

इतिहास सशोधनाचे हें कार्य राष्ट्रीय कार्य होते तें का राजवाडचाच्या घरचे होतें ? त्यासाठी ज्यांना आर्थिक साहाय्य देणे शक्य होते, नव्हे ज्याचे तें कर्तव्य होतें ते लोक काय करीत होते ?

" राजे निजले आहेत, जहागिरदार डुलक्या घेत आहेत, आणि इनामदार झोपा काढीत आहेत."

परिस्थिति ही अशी होती पण 'परिस्थितीचे गुलाम होण्यापेक्षा मालक होणें पुरुषार्थाचे कर्म' असे मानणारे राजवाडे अडचणींचे हिमालय आडवे आले म्हणून डगमगणारे नव्हते

राजे, इनामदार आणि जहागिरदार झोपा काढीत होते म्हणून इतरानीहि तसेच करावे, असे कुणी सागितले आहे ?

म्हणूनच राजवाडे यानी निश्चय केला—

" ते जागे होईपर्यंत, जागे झालेले मध्यम स्थितींतील जे आपण त्यानीं राष्ट्राच्या या पितराचे स्मरण कायम ठेविलें पाहिजे आपले सामर्थ्य अद्यापि जुजबी आहे, तथापि ह्या पुण्यकर्माप्रीत्यर्थ तें खर्चिले पाहिजे "

**रोमरोमांत इतिहासप्रेम :**

राजवाडे इतिहास सशोधनाकडे वळले हा कांही एका दिवसात घडलेला चमत्कार नव्हे

राजवाडचाच्या रोमरोमात इतिहासप्रेम कसें भिनले होतें तें त्या दृष्टीने पहाण्यासारखें आहे.

ज्या ठिकाणीं इतिहास घडला त्या ठिकाणीं गेलें कीं त्याच्या डोळचापुढें सारा भूतकाळ उभा राही. मनानें ते

शेंकडों वर्षें मागें जात. त्या लढाया, ते तह सारें सारें त्याच्या अंत:चक्षूपुढून सरकू लागे.

इथें तलवार बाजीची विराजे, मस्त रगेल
इथें झेंडा मराठ्याचा उडे वाऱ्यावरी स्वैर ।।

एके काळीं ज्या ठिकाणीं मराठी राज्याचे वैभव विलसत होतें त्या ठिकाणीं आज काय दिसतें आहे ? हा विचार मनात येऊन ते विषण्ण होत.

सभोती फुर्फुरे घोडा, झुलावा हत्ति दारांत
तिथें का रान माजावे ! कुठें तो वैभवी नूर !

ज्या डेक्कन कॉलेजमध्यें ते शिकत होते त्या जागेकडे पहाताना त्याना असाच पूर्वेतिहास आठवे—

"ज्या स्थलावर डेक्कन कॉलेज बाधलेलें आहे त्या स्थलाचें महात्म्यच असें आहे कीं, त्या स्थली येणाऱ्या प्रत्येक मराठ्याला एक प्रकारचें औदासिन्यच प्राप्त व्हावे. १८१७ त मराठ्याचे राज्य जाण्याच्या सुमारास खडकीची जी लढाई झाली म्हणून म्हणतात ती ह्याच स्थलीं झाली. कॉलेजाभोंवतालील माळावर अद्यापहि मनुष्यांची हाडें कधीमधी सापडतात म्हणून म्हणतात. ह्या ठिकाणीं मराठ्यांचा मोड झाला आणि मराठी राष्ट्राचा अत झाला अशा ह्या अपशकुनी जागेवर बाधलेल्या इमारतीत कोण्या मराठ्याचें मन रमेल ?"

इतकें इतिहासमय झालेलें राजवाड्याचें मन मराठ्यांच्या खऱ्याखुऱ्या इतिहासाचा शोध करण्याकडे धांवावे, यांत आश्चर्य तें कोणतें ?

बी. ए. करिता इतिहासाचा अभ्यास करतांना त्यांतील उणिवा त्यांच्या चिकित्सक दृष्टीला काय दिसण्यासारख्या नव्हत्या ? महाराष्ट्राचा इतिहास आम्हाला वाचायचा असेल तर तो होता ग्रांट डफ या इग्रज लेखकाने लिहिलेला. एक तर हा इंग्रज गृहस्थ. तो मराठ्यांच्या पराक्रमाचीं वर्णनें कितीशा तळमळीने करणार ? त्याची दृष्टि आणि हृदय हें अर्थातच इग्रज लोक आणि भारतातील इंग्रजी सत्ता याकडेच अधिक होतें. बरे, हा डफ मोठा प्रसिद्ध इतिहास सशोधक होता, असेंहि नव्हे त्याचें शिक्षण अल्प होतें आणि वाचन मर्यादित होतें असा माणूस सशोधन करणार तें कितीसें ? आणि केलेच तरी त्याचा दर्जा तो कोणता असणार ?

इ. स १६४६ ते १७९६ पर्यंतचा काळ मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीनें किती महत्त्वाचा ! ह्या १५० वर्षांच्या काळात मराठ्यानी थोड्या का खटाटोपी केल्या ? पण डफनें हा सगळा इतिहास लिहिला तो ४७५ पृष्ठांत आणि पुढील अवघ्या बावीस वर्षांच्या इतिहासाकरिता पानें खर्च घातली तीं मात्र पुरीं दोनशें. हा स्वच्छ पुरावाच मराठ्याच्या इतिहासाकडे पहाण्याची डफची दृष्टि कोणती होती, हें स्पष्ट करीत नाही काय ?

ग्राट डफच्या इतिहासाने एक कामगिरी मात्र केली आणि ती म्हणजे मराठ्याचे नाव बद्दू करण्याची !

राजवाडे हे देशाभिमानी होते. राष्ट्राच्या इतिहासाबद्दल अभिमान बाळगणारे होते. त्याच्यासारख्या

इतिहासाच्या खऱ्याखुऱ्या अभ्यासकाला ही परिस्थिति कशी पहावेल ? कशी सहन होईल ?

इतिहासाचें संशोधन व स्वराष्ट्राच्या इतिहासाचे लेखन या दोन गोष्टी राष्ट्रोद्धारास अत्यंत आवश्यक आहेत- राष्ट्राची परदास्यातून सुटका होण्यासाठीं त्या आवश्यक आहेत अशी राजवाड्याची मनोमन खात्री पटली होती.

ग्रांट डफ हजारो ठिकाणीं कसा चुकला आहे, तें दाखविणें जरूर होतें आणि त्याबरोबरच मराठ्याचा खराखुरा साधार इतिहास राष्ट्रापुढें ठेवणेंहि आवश्यक होतें.

राजवाड्यांनी तें करावयाचे ठरविले

**तहानभूक विसरून काम :**

तसें पाहिले तर सन १८८५ पासून मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास त्यांनीं सुरू केला होता आणि इ. स. १८८८ पासून म्हणजे राजवाडे कॉलेजमध्यें होते तेव्हापासूनच इतिहास संशोधनाकडे त्याचें लक्ष लागलें होतें.

त्या दृष्टीनें त्याचें कार्य चालूच होतें.

१८९५-९६ च्या सुमारास वाई येथें जाऊन संशोधनाच्या दृष्टीनें मोठें काम करण्याची संधि त्याना आली अशा संधीची ते वाटच पहात होते.

त्या ठिकाणी तातडीनें जाऊन लगेच ते कामालाहि लागले. काम मोठें होतें आणि रात्रदिवस त्याचे तें काम सारखें चालूच होतें.

'त्यावेळी राजवाडे याची त्या दप्तराशीं इतकी तन्मय वृत्ति झाली होती की, त्यास आहार, निद्रादि कोणताहि

व्यवहार बिलकुल सुचत नसे. रात्रीं, दिवसा, पहाटे, सध्या-काळीं ज्यावेळीं पहावे त्यावेळी राजवाडे दप्तराचा अभ्यास करीत असलेले दिसावयाचे काम करताना जरा दमल्या-सारखें वाटले म्हणजे झोप घ्यावयाची व १०–१५ मिनि-टांनीं फिरून जागें होऊन कागदपत्र वाचू लागावयाचे आणि केवळ जगण्याकरिता म्हणून पोटात भूक लागली म्हणजे वेळींअवेळी वाटेल ते खावयाचें'

अशा प्रकारे दोन महिन्यात हातीं आलेल्या दप्तरातील सर्व कागद त्यानी अथपासूच इतिपर्यंत वाचून काढले, ते लावले आणि पुण्यास येऊन तेथील विठ्ठल छापखान्यात लगेच छपाईलाहि सुरवात झाली

पण दैव तरी काय कमी लहरी असतें ? माणसाचा छळ करण्याची त्याला कधीं आणि कशी लहर येईल हें कुणी, कसे सागावे ?

छापखान्यात छपाईसाठीं म्हणून राजवाड्यांनीं अतिशय परिश्रमपूर्वक लिहिलेले कागद टाकले आणि नेमका त्याच-वेळीं छापखाना जळून गेला !

सुरवातीलाच अपशकुन ! सर्वसामान्य माणूस तर खचू-नच गेला असता यानें पण राजवाडे त्यातले नव्हते

त्यांनीं हातीं घेतलेला उद्योग अर्थातच सोडला नाहीं पण ते चिडले. चांगलेच चिडले आणि तणतणतच बाईस आले मग पुन्हा सर्व दप्तर बालबोधींत लिहून काढावे लागलें आणि पुन्हा तें छापखान्याकडे द्यावे लागले

अखेरीस इ. स. १८९८ मध्यें 'मराठ्याच्या इतिहासाचीं साधने' : पहिला खड प्रसिद्ध झाला

पहिला खंड बाहेर पडला आणि लोकाचें लक्ष राज-वाड्यांकडे वेधलें.

त्या खंडाला राजवाडे यानी लिहिलेली प्रस्तावना साऱ्यांना हेंच सागू लागली कीं विसुभाऊ राजवाडे हे इतिहासाचे गाढे अभ्यासक आहेत. एक थोर इतिहास सशोधक म्हणून राजवाड्यांची ख्याति झाली

'इतिहासाच्या क्षेत्रांत राजवाडे याच्या पहिल्या खडाच्या योग्यतेचा दुसरा ग्रथ गेल्या पन्नास वर्षांत झालाच नाहीं,' असा त्याचा गौरव जाणत्याकडून झाला

हें झाले लोकाचे पण खुद्द राजवाड्याचे विचार काय होते ?

हें कार्य करून ते काय मिळविणार होते ?

ते म्हणतात––

"शोध करून विद्वन्मान्यता मिळावी किंवा प्रतिभासपन्न लोकात गणना व्हावी असा हव्यास धरण्याची आकाक्षा ह्यापुढें आम्हांला राहिली नाही. आम्ही आपल्याला एकच स्वल्प काम आखून घेतले आहे काव्येतिहासादीचीं साधनें शरीरसामर्थ्य असेल तोपर्यंत जमविण्याची व तीं अस्सल बरहुकूम प्रसिद्ध करण्याची एकच आकाक्षा आम्ही बाळगिली आहे"

जनतेचे लक्ष या विषयाकडे वेधले जावे ही राजवाड्यांची मनीषा ह्या प्रथम खडानें बरीच साध्य झाली होती.

ते दुप्पट उत्साहानें कार्याला लागले. त्यानी आणखी काही मनोरथ रचले. 'मराठ्याचा सर्व इतिहास व पर्या-

यानें हिंदुस्थानचाहि इतिहास तयार करता येईल.' हा त्यापैकीच एक विचार होता.

वाईजवळील मेणवली येथील नाना फडणविसांचें दप्तर पहाण्याचा योग त्याना लवकरच आला. हें दप्तर तपासण्याचें काम पहाटे पाच ते रात्री अकरा वाजेपर्यंत चाले.

असे अविश्रांत काम करीत असतां जर कोणी त्याना म्हणाले, 'अहो, असे काम करून मरायची पाळी यायची.'

तर ते म्हणत, 'काम करून मनुष्य मरत नाही आळसानें लवकर मरतो.'

मेणवली दप्तराच्या कामी राजवाड्यांनीं पदरचे ८० रुपये खर्च केले. जवळ कधीं काहीं फारसे धन नसायचें पण जर असेल तर तें चागल्या कार्यासाठीं खर्च व्हावें, यातच त्याचा आनद साठविलेला होता.

पण मेणवली दप्तराचें काम राजवाड्यांकरवीं पुरें होण्याचा योग नव्हता. दप्तरांतील कांहीं नकाशे चोरीस गेल्याचा आळ त्याच्यावर आला आणि राजवाड्यांना मेणवलीस रामराम ठोकावा लागला

राजवाड्याना आलेला अनुभव त्यांना जगाचें खरें रूप दाखविणारा होता. कोणालाहि निरुत्साही बनविणारा होता

पण राजवाडे निरुत्साही बनले नाहीत.

याच सुमारास ब्रह्मेंद्रस्वामीचें चरित्र व पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला होता.

अभ्यासूना त्यात उणिवा दिसत होत्या. त्या दाखविण्यासाठी सशोधनाची जरूरी होती.

राजवाडे यांनीं तें काम केलें ब्रह्मेंद्रस्वामींबद्दलची काहीं पत्रें मिळवून त्यानी तीं प्रसिद्ध केलीं आणि ब्रह्मेंद्र-स्वामींचें खरें रूप स्पष्ट केलें.

राजवाड्याचें सशोधनकार्य अनेक अडचणींतून मार्ग काढून सुरू होतें येणाऱ्या अडचणीचें स्वरूप तरी किती विविध प्रकारचें होतें ?

सूर्याजी पिसाळासंबधीचें एक दप्तर राजवाड्यांच्या हाती आलें. त्याचें सशोधन करून 'सूर्याजी हा राजद्रोही होता' असें राजवाडे यानी प्रतिपादन केले

ही गोष्ट पिसाळ देशमुखाच्या विद्यमान घराण्यास कळतांच त्यानीं राजवाडे यास पुढें दप्तर देण्याचेंच नाकारलें.

झालें. हाताशीं आलेले दप्तर दूर गेलें !

ऐतिहासिक स्थळें, किल्ले, शिलालेख, जुनीं कागदपत्रें ही इतिहासाची साधनें साऱ्या भरतखडात विखुरलेलीं त्यानिमित्तानें ठिकठिकाणीं हिंडताना कांहीं वेळेस भयकर संकटांना तोंड देण्याचा प्रसगहि त्यांच्यावर येई.

मुंबईजवळील समुद्रात खादेरीउदेरी या नांवाचें एक ठिकाण आहे. संशोधनाच्या दृष्टीनें तें पहावें असे राज-वाड्याना वाटले. सागरभरतीच्या वेळीं ते कुलाब्याच्या दांडीपर्यंत गेले. तेथें निरीक्षण करण्यांत ते इतके गुग झाले की सध्याकाळ कधीं झाली तें त्याना कळले देखील नाहीं. रात्र पडू लागली आणि पहारेकऱ्यानें सूचना दिली तेव्हां ते भानावर आले.

ते परत निघाले पण भरती चढत चालली होती.

आता काय करावें? होडीहि मिळण्याचें चिन्ह दिसेना अखेरीस एका खलाश्याचे मागोमाग ते पोहत निघाले.

पण खलाश्यानें मध्येच तोंडघशीं पाडलें. तो दीपगृहाकडे वळला.

राजवाड्यांवर मोठा कठीण प्रसंग आला होता.

सुदैवानें नेमका त्याचवेळी जाळें टाकून उभा असलेल्या एका कोळ्याचें लक्ष त्याच्याकडे गेलें त्यानें त्या रोखानें लांबवर जाळें फेकलें आणि राजवाड्यांना तो आधार पुरेसा झाला.

ते किनाऱ्यावर आले.

इतिहाससंशोधनाच्या नादापायीं त्यांनीं साहसें तरी थोडीं का केली?

हालचालीचे बरेच गुप्त मार्ग मराठ्यांच्या राज्यांत होते शिवाजी महाराज हे रायगडाहून पुणे प्रांती अशा एका मार्गानें एकाएकी येत असत हें राजवाड्यांना कळतांच ते त्या मार्गाचा शोध लावण्याच्या मागें लागले हिंडून हिंडून सह्याद्रीत त्यांना एक घळ सापडली एकीकडे उंचच उंच पर्वत व दुसरीकडे खोलच खोल दरी अशी ती जागा इकडे तिकडे झाले की संपलेच सारें! पण अशा घळींतून जाण्यासहि त्यानी मागें पुढें पाहिले नाही

कुठें काही ऐतिहासिक पुरावा सांपडतो आहे असे कळायचा अवकाश कीं राजवाडे निघालेच तिकडे काबूलपर्यंतहि या कामासाठीं जाण्यास त्यानीं कमी केलें नाहीं.

गांवोगांव त्यांना मुक्काम करण्याचा प्रसंग येई. पण सर्वच ठिकाणी हा मुक्काम सुखकर थोडाच होत होता !

एकदां वाईस मुक्कामास असतांना त्या कुटुंबातील नथ नाहीशी झाली आणि राजवाड्यांचाच संशय घेण्यापर्यंत मालकीणबाईची मजल गेली ! राजवाड्यांच्या दुसऱ्या एका स्नेह्याने 'ही गोष्ट राजवाड्यांकडून कधीहि होणें शक्य नाहीं' असे जेव्हां पटवून दिले तेव्हां कुठें त्यांतून त्यांची सुटका झाली !

प्रत्यक्ष ऐतिहासिक कागद हातीं मिळवणे हें काम तरी कुठें सोपें होतें ! एखाद्याकडे महत्प्रयासानें तसे कागद मिळण्याची शक्यता निर्माण झाली तरी आज या, उद्यां या असे हेलपाटे घालण्यात किती दिवस जातील याचाहि कांही नियम नसे

राजवाड्यांनीं जें इतिहाससंशोधनाचें काम आपलें जीवितकार्य म्हणून हातीं घेतलें तें किती जिकीरीचें होतें हें का आणखी निराळें सांगावयास हवें ?

आणि अशाहि परिस्थितीत एकदोन नव्हे तर चांगले बावीस खंड त्यांनीं प्रसिद्ध केले. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' बावीस खंडांत प्रसिद्ध झाली.

इतिहास संशोधनाच्या त्यांच्या प्रचंड कार्यांत 'महिकावतीची बखर,' 'राधामाधवविलासचंपू' याचाहि अवश्य उल्लेख करावयास हवा त्यांनीं लिहिलेल्या प्रस्तावना हा तर स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल इतक्या तोलामोलाच्या त्या आहेत. इतिहासविषयक त्यांचीं टाचणें-टिपणें कितीतरी आहेत.

इतिहास संशोधक मडळाची स्थापना :

राष्ट्राच्या इतिहासाचे सशोधन हें काम का लहानसहान आहे ? एका राजवाड्याचे हें काम नव्हतें असे अनेक राजवाडे निघाले तरच हें काम भरीवपणे होणार.

त्यासाठीं सघटित प्रयत्नांची जरूरी होती. राजवाड्याना याची पुरेपूर कल्पना होती. त्यानीच पुढाकार घेतला आणि मग त्यातूनच पुण्याच्या इतिहास सशोधन मडळाची स्थापना झाली.

आळस झाडून लोकानी काम करावे ही राजवाड्याची मनीषा मला हें जमेल की नाही असे रडगाणें गाणारीं माणसे त्याना आवडत नसत

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ॥

—ही त्याची विचारसरणी होती.

एकदां ते वऱ्हाडात गेले असतां त्यांना एक विद्वान गृहस्थ भेटले त्यानी राजवाड्याना विचारले, 'मी कोणत्या कार्यास लायक आहें असे आपणास वाटतें ?'

राजवाडे ताडकन् उत्तरले, 'तुम्ही मरायला मात्र लायक आहात !'

जगात कार्याला काय तोटा पडला आहे ? उणीव आहे ती तें कार्य निष्ठापूर्वक करणाराची. असे लोक दिसत नाहींत याबद्दल राजवाडे सतापत.

लोकांनीं कामास लागावे आणि जें करतां येण्यासारखें आहे तें करीत रहावे, त्यांतच त्याच्या जीवनाचे सार्थक आहे आणि देशाचेहि हित आहे असे त्याना वाटे.

लोकांनीं एकत्र यावे आणि त्यातून सर्वांना हितकर असें कार्य साधावे यासाठीं पुण्याप्रमाणेच अमळनेरचे इतिहास संशोधन मंडळ, आरोग्य मंडळ, कर्ज देणारें मंडळ, उतारूच्या तक्रारी दूर करणारें मंडळ, समाजशास्त्र मंडळ, शिक्षा विचार मंडळ अशीं अनेक मंडळें त्यांनी स्थापिलीं.

इतिहास संशोधनाच्या कार्यासाठीं विसुभाऊनीं आपल्या आयुष्यातील तीसपस्तीस वर्षें खर्च केली. त्यांचे श्रम कांहीं वायां गेले नाहींत ते काम करण्यास इतर विद्वान माणसे या क्षेत्रात उतरलीं—आणि राजवाडे तेथून दूर झाले!

त्यानंतर त्यानीं भाषाशास्त्रविषयक कामगिरी हातीं घेतली. अफाट अशा वाणीच्या क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला

**ह्यिचे पुत्र आम्हीं हिचे पांग फेडूं :**

इंग्रजी वातावरणाचा राजवाड्यांवर किती परिणाम झाला होता, हें त्यांनीच एका ठिकाणीं लिहून ठेवलें आहे—

"बाराव्या वर्षापासून सव्विसाव्या वर्षापर्यंतच्या पंधरा वर्षांत वाचणे, लिहिणें, विचार करणे वगैरे सर्व मानसिक क्रिया मी इंग्रजींत करूं लागलों"

पण विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे निबंध, काव्येतिहास-संग्रहकारांचीं ऐतिहासिक पत्रें व परशुरामपंत गोडबोले यांचीं काव्यें–ह्या साहित्यानें राजवाड्यांना स्वभाषा विसरू दिली नाहीं ज्ञानेश्वरतुकारामांच्या मराठीनें त्यांचें अंतः-करण काबीज केले

'भाषांतर' हें मासिक सुरू करून त्यांतून त्यानीं जग-प्रसिद्ध ग्रंथकार प्लेटो याच्या 'रिपब्लिक' ग्रंथाचे स्वतः

विद्यार्थीदशेंत केलेलें मराठी भाषांतर व इतर नामवंत इंग्रजी ग्रथाचीं भाषातरे प्रसिद्ध केलीं.

वाई प्रातात सशोधनाच्या कामगिरीवर असताना राजवाडे याना 'ज्ञानेश्वरी'ची एक जुनी प्रत सापडली सशोधकाच्या दृष्टीनें हा अमोल ठेवा होता. विद्वानाना विचार करायला लावील असा राजवाड्याचा 'ज्ञानेश्वरीचे व्याकरण' हा ग्रथ त्या सशोधनातून बाहेर पडला.

भाषेंतील तीस हजार धातु गोळा करून त्यांची प्रक्रिया व अव्युत्पत्ति उलगडण्याचा राजवाड्याचा खटाटोप तर अपूर्वच म्हणावा लागेल.

भाषाशास्त्रविषयक त्यांचे निबध त्याच्या अभ्यासू वृत्तीची, चिकित्सक दृष्टीची आणि मार्मिक बुद्धीची ओळख पटवितात

'भारतीय विवाहपद्धति', 'चातुर्वर्ण्य' इत्यादि त्याच्या लेखातून त्यांचा समाजशास्त्राचा गाढा व्यासग दिसून येतो. सामाजिक इतिहासाचा काही कण सापडतो असें दिसताच लोकगीते, गाणीं इकडे त्याचें लक्ष वेधे आणि खनपटीस बसून ते लोकापुढें तीं आणीत

महानुभाव पथ हा ज्ञानेश्वराच्या अगोदरचा. त्याचें वाङ्मय थोर पण सारे साकेतिक लिपींत लिहिलेलें. त्या लिपीचा उलगडा करून राजवाड्यानी महानुभावी महंतांनासुद्धा चकित केलें.

लोकापुढें माडावयाच्या कोणत्याहि विषयाचा सखोल अभ्यास व्हावा अशी राजवाड्याची दृष्टि असे मग त्यासाठी कितीहि श्रम पडोत. 'महाराष्ट्र वसाहतीचा

इतिहास' त्यांना लिहावयाचा होता. त्याकरितां निर-निराळ्या क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन बडवे, पडचे यांच्या वह्या त्यानी तपासल्या. घरासमोरून जाणाऱ्यायेणाऱ्यांना हटकून त्याची आडनावें, गोत्र वगैरे माहिती गोळा केली.

केवढा हा खटाटोप ! राजवाड्यानीं जें लिहिले तें हें असें लिहिलें. उगीच का त्यांच्या लिखाणाला मोल आलें आणि एक आगळेंच तेज प्राप्त झालें ?

### कार्य करायचें म्हणून जगायचें :

राजवाड्यांनीं मोठें काम हातीं घेतलें आणि जिवांत जीव असेपर्यंत तें मनापासून निष्ठेनें केलेहि

राजवाड्याना खूप काम करायचे होतें त्यासाठीं कमींत कमी शभर वर्षें जगायचे होतें. किती काम करू नि किती नको असे त्यांना झाले होते.

त्याना ४६ वें वर्ष लागले, तेव्हा केलेल्या एक टिपणांत ते लिहितात–"या विसाला नवें ४६ वे वर्ष लागलें. ५४ राहिली त्यात सर्व जगताला हितकारक व राष्ट्राला पोषक अशी कृति होवो. यापुढें कृति कृति कृति झाली पाहिजे नाहीतर व्यर्थ !"

राजवाड्याची ही अशी इच्छा होती, पण परमेश्वराची नव्हती. राजवाड्यांनी आपल्या आयुष्यात अविश्रांत काम केले होतें. त्यानी अजून त्रास घ्यावा अशी परमेश्वराची इच्छा नव्हती परमेश्वराच्या मनात त्याना कायमची विश्रांति द्यायचे होतें

आणि त्याप्रमाणे ३१ डिसेंबर १९२६ रोजीं धुळें येथून चिरविश्रांतीसाठीं राजवाडे हा लोक सोडून गेले.

922 दि. 20/4/09
बा. बा.

BVBK-0401227

# काहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'काहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

**तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें**

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया (रशिया)
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : बुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई

**शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना**

२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विद्यामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४०. शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हायेसें वाटतें ?

**प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे   संच पेटी रु. २५.**

**वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.**